स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२२८ दि. ०८/०९/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती निमित्त 'मराठी भाषा दूत' ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभागी होणेबाबत..

संदर्भ: १.मा. कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुबंई, महाराष्ट्र शासन यांचे क्रमांक: अमभा–२०२६/प्र.क्र.९४/भाषा–१, दि. ०२ सप्टेंबर, २०२६ रोजीचे पत्र
२.मा.प्र–कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र दि.०७ सप्टेंबर २०२६ रोजी अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभागामार्फत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त 'मराठी भाषा दूत' ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा १६ ते २१ वयोगटाकरिता आहे. सदर स्पर्धा दि. २९ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान, सकाळी १० ते सायं. ०६ या कालावधीमध्ये ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. वक्तृत्व स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे आहेत.

१. महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान
२. महात्मा फुले आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार
३. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण व स्त्री सक्षमीकरण यांतील योगदान
४. महात्मा फुले – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्फूर्तिस्थान
५. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार
६. आजच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व

सदर ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता पुढील गुगल फॉर्मद्वारे
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfjDbqfjCsXNy95QXxGpwADmqlgFBmKWZvLCklMKAFD0UNu6g/viewform
दि. २५ सप्टेंबर २०२६ (सायं.०६)पुर्वी नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. तरी आपण आपल्या महाविद्यालयामधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना ह्या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता आवाहन करावे. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

अधिक माहितीकरिता संपर्क : **augustmedia2026@gmail.com**

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२- २२७९ ४१ ६८ Email ID - shilpa.deshmukh@nic.in

---

क्रमांक : अमभा -२०२६/प्र.क्र.९४ /भाषा-१ दिनांक :-०२/०९/२०२६

प्रति,

१. महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांचे माननीय कुलगुरू,
२. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे
३. महाराष्ट्र राज्यातील कला, विज्ञान, वाणिज्य, कृषी, विधी, तंत्रशास्त्र, अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांचे व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे सर्व प्राचार्य.
४. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

विषय :- अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त आयोजित केलेल्या "मराठी भाषा दूत" ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्याबाबत.

महोदय/महोदया,

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सन २०२६-२७ मध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे व्दिशताब्दी जन्म वर्ष साजरे करण्याकरिता विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविले आहे.

सदर कार्यक्रमांचे औचित्य साधून शासनामार्फत दिनांक २९/०९/२०२६ ते दि. ६/१०/२०२६ या कालावधीत खालील विषयांवर ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे,

१. महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान
२. महात्मा फुले आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार
३. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण व स्त्री सक्षमीकरण यांतील योगदान
४. महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्फूर्तिस्थान
५. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार
६. आजच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्व.

सदर स्पर्धेच्या आयोजनाच्या अनुषंगाने वयोगट,स्पर्धेतील सहभाग तसेच, स्पर्धेत सहभागी होण्याचा शेवटचा दिनांक तसेच अन्य बाबी खालीलप्रमाणे आहेत,

१. सदर स्पर्धा १६ ते २१ या वयोगटासाठी आहे.
२. अर्ज भरण्याची शेवटची तारीख २५ सप्टेंबर संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहे.
३. जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घेता यावा याकरिता एका संस्थेतून/ महाविद्यालयातून कितीही स्पर्धक सहभागी होऊ शकतील.
४. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

५. नोंदणी करणाऱ्या पहिल्या १००० विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल.

६. स्पर्धेत सहभागी निवडक व गुणवत्तापूर्ण १०० विद्यार्थ्यांची मराठी भाषा दूत म्हणून नियुक्ती करण्यात येईल अशा विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या अनुषंगाने वेळोवेळी जबाबदाऱ्या सोपविण्यात येतील.

सबब,सदर वक्तृत्व स्पर्धेमध्ये देखील आपल्या विद्यापीठातील तसेच, महाविद्यालयातील जास्तीत जास्त संख्येने युवक-युवतींनी या सहभागी व्हावे यासाठी आपल्या स्तरावरून त्यांना प्रोत्साहित करण्यात यावे आणि या स्पर्धेची आपल्या स्तरावरून व्यापक स्वरूपात प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवक- युवतींनी https://forms.gle/3MSNkcFk8GV4iy6C9 या लिंकवर किंवा या क्यू आर कोडवर दिनांक २५ सप्टेंबर,२०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी.

आपला,

(मा.ल. ल्हायकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती, भाषा-१